रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## गणेशोत्सवानिमित्त गणिताची प्रयोगशाळा व नामगिरी देवीचा देखावा

### विजयादशमीपर्यंत चालणारी प्रदर्शनी विनामूल्य व सर्वांसाठी खुली

**जालना । प्रतिनिधी -** गणेशोत्सव म्हटले की भव्य सजावट, देखावे आणि सांस्कृतिक उपक्रम अपेक्षित असतात. मात्र, प्रा. श्रीकांत चिंचखेडकर गेल्या २१ वर्षापासून अखंडपणे देखाव्याच्या माध्यमातून टाकाऊ वस्तु आणि पर्यावरणपूरक साहित्यापासून निर्जीव देखावे सादर करण्याची परंपरा जपत आले आहेत. यंदा प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी गणित व संस्कृतीचा अद्भुत मेळ साधत गणित प्रयोगशाळा उभारली असून, त्यासोबतच तामिळनाडूतील सुप्रसिद्ध नामगिरी देवीचा देखावाही प्रेक्षकांचे डोळे दिपवणारा ठरत आहे. ही प्रदर्शनी विजयादशमीपर्यंत दररोज सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुली आहे.

सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवणारे प्रा. चिंचखेडकर दरवर्षी गणेशोत्सवात हरी ओमनगरमधील निवासस्थानी



गणेशोत्सव ते विजयादशमीपर्यंत प्रदर्शनी लावतात. यंदा गणितातील गूढ संकल्पना जनमानसात पोहोचवण्यासाठी एका आगळ्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून ते नवा प्रयोग घेऊन आले आहेत. या प्रयोगशाळेत जवळपास १०० हून अधिक वर्किंग मॉडेल्स साकारले असून, गणितातील मूलभूत संकल्पना, सूत्रे आणि समीकरणे अगदी सोप्या, रंजक व गमतीशीर पद्धतीने सादर करण्यात आली आहेत.

या प्रयोगशाळेतील विशेष आकर्षण म्हणजे जगप्रसिद्ध गणितज्ञांचे भव्य मूर्तीरूप चरित्र. यात श्रीनिवास रामानुजन, आर्किमिडीज, महावीराचार्य, नेपियर, स्वामी भारती कृष्ण तीर्थ, पायथागोरस, भास्कराचार्य (द्वितीय), कार्ल गॉस, अपोलोनियस, युक्लिड, श्रीधराचार्य, बोधायन, प्रशांत चंद्र महालनोबिस यांसारख्या भारतीय व परदेशी दिग्गज गणितज्ञांचे कार्य प्रभावीपणे उभे करण्यात आले आहे. गणिताची भीती विद्यार्थ्यांच्या मनातून घालवून त्यांच्या मनात या विषयाविषयी आकर्षण निर्माण करणे हा या प्रदर्शनामागील मुख्य उद्देश आहे. त्याचबरोबर महान गणितज्ञांच्या कार्याचा गौरव करून त्यांची प्रेरणादायी माहिती प्रत्येकापर्यंत पोहोचवणे हेही ध्येय प्रा. चिंचखेडकर यांनी ठेवले आहे.

विशेष म्हणजे, रामानुजन यांना स्वप्नातून गणितीय सूत्रे सुचवणारी तामिळनाडूतील नामगिरी देवीचा देखावाही या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरत आहे. गणिताचा वैज्ञानिक गाभा आणि अध्यात्मिकतेचा संगम यातून अधोरेखित होत असल्याचे प्रेक्षकांना अनुभवास येत आहे.

गेल्या वर्षी त्यांनी विज्ञान प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण केली होती, तर यंदा गणिताचे अप्रतिम विश्व उलगडून दाखवले आहे. गणितप्रेमी, विद्यार्थी व पालकांनी अवश्य भेट द्यावी, असे आवाहन प्रा. चिंचखेडकर यांनी केले आहे.

### नामगिरीदेवी ही गणित आणि अध्यात्माचा सेतू

गणित हा विषय बहुतेक विद्यार्थ्यांना भीतीदायक वाटतो. पण गणित हे प्रत्यक्षात आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. गणेशोत्सवासारख्या उत्सवाच्या निमित्ताने जर आपण मुलांसमोर गणित अगदी सोप्या, रंजक व प्रात्यक्षिक स्वरूपात मांडले, तर त्यांची दृष्टी बदलू शकते, हा माझा विश्वास आहे. याच उद्देशाने गणित प्रयोगशाळा साकारली. या प्रयोगशाळेतून विद्यार्थ्यांना गणितातली गंमत आणि उपयुक्तता दोन्ही समजावून सांगायची आहे. रामानुजन यांना स्वप्नातून सूत्रे सुचवणारी नामगिरी देवी ही गणित आणि अध्यात्म यांचा सेतू आहे. हा देखावा साकारताना मी हेच अधोरेखित करायचा प्रयत्न केला की ज्ञान आणि श्रद्धा यांचा संगम झाल्यावरच खरी प्रेरणा निर्माण होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड, जिज्ञासा आणि अभिमान निर्माण व्हावा, हीच माझी खरी इच्छा असल्याचे प्रा. श्रीकांत चिंचखेडकर म्हणाले.

## सरसकट मराठे कुणबीची मागणी

### जरांगे पाटीलांचा निर्धार कायम

**मुंबई -** मुंबईच्या आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी सुरू असलेले मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण दुसऱ्या दिवशीही तितक्याच तीव्रतेने सुरू राहिले आहे. लाखो मराठा कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण मुंबईत आंदोलनाचा जोर वाढला आहे. सरकारकडून अद्याप ठोस निर्णय न आल्याने मराठा समाजात नाराजीचे वातावरण आहे, तर आंदोलकांचा निर्धार दिवसेंदिवस अधिक तीव्र होताना दिसत आहे.

आझाद मैदानावरील उपोषणाला सुरुवातीला फक्त एका दिवसाची परवानगी दिल्यानंतर आंदोलनाची मुदत संपणार का, असा प्रश्न उपस्थित झाला होता. मात्र आंदोलकांच्या मागणीवर अखेर मुंबई पोलिसांनी आणखी एका दिवसाची परवानगी दिली आहे. आंदोलनाला रोज परवानगी घ्यावी लागणार असल्याने आयोजकांमध्ये काही प्रमाणात अस्वस्थता असली, तरी लढ्याची तीव्रता कमी झालेली नाही.

मनोज जरांगे पाटील यांनी दुसऱ्या दिवशी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सरसकट मराठे कुणबी असल्याचा शासन निर्णय (जीआर) निघाल्याशिवाय मागे हटणार नाही. सरकारने वेळकाढूपणा केला तर लढा अधिक उग्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

पहिल्या दिवशी आंदोलनाच्या ठिकाणी झालेल्या अव्यवस्थेवरून आंदोलकांनी संतप्त प्रतिक्रिया दिली होती. यावर मुंबई महानगरपालिका (इचउ) प्रशासनाने आज सकाळी तातडीने मैदान परिसरात पाणी, शौचालये, वैद्यकीय सुविधा अशा सोयी उपलब्ध करून दिल्या. यानंतर वातावरण काहीसे शांत झाले असले तरी आंदोलकांचा संताप आणि निर्धार अजूनही कायम आहे.

दुपारी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक पार पडली. त्यानंतर थेट मंत्र्यांना न पाठवता शिंदे समितीला जरांगे पाटील यांच्याशी संवादासाठी मैदानावर पाठवण्यात आले. समितीने आतापर्यंतच्या कार्याचा आढावा दिला आणि शासन स्तरावर कोणत्या उपाययोजना सुरू आहेत, याची माहिती दिली. मात्र, अद्याप कोणताही ठोस निर्णय किंवा वेळापत्रक स्पष्ट झालेले नाही.

जरांगे पाटील यांनी हैदराबाद आणि सातारा संस्थानाच्या गॅझेटिअरचा मुद्दा पुन्हा एकदा अधोरेखित केला. त्यांनी ठामपणे सांगितले की, सातारा आणि हैदराबाद संस्थानांचे गॅझेटिअर लागू करण्यासाठी एक मिनिटाचाही अवधी देणार नाही. मात्र औंध संस्थानाच्या गॅझेटिअरचा सखोल अभ्यास करण्यास ते तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिंदे समितीने आपल्या चर्चेदरम्यान आंदोलकांना कळवले की, **पान ३ वर**

युवा आदर्श

### गौरी गणेश मुर्ती

गणपती मुर्ती घडवी
लाखलाख मुर्तीकार
हिंदु मुस्लिम ईसाई
सकल जातकामगार
भेदभाव न गणेशां
फक्त हवे कारीगार
उत्सवामुळे मिळतो
गरीब घरास आधार
मुर्ती बनता बनवता
जीवना देतो आकार
मुर्ती भासते जीवंत
आपले मनी विकार
पोटभरून जेवतात
ते असंख्य कलाकार
ईश्वर असे कनवाळू
सर्वां प्रदान रोजगार
उत्साह असा उत्सवा
भरतो नवीन हुंकार
भेदा भेद हे जळावे
मिळो सर्वां अधिकार
गजानन सोबत गौरी
परंपरेतला चमत्कार
नर नारी समान मान
दोघांना सम नमस्कार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### जालना गणेश फेस्टिवलमध्ये समाधानभाऊ शर्मा यांचे हरि कीर्तन

## भाव, भाषा, भेष आणि भूमी ह्या चार गोष्टी कधीही बदलू नका-समाधान शर्मा

**जालना । प्रतिनिधी -** भाव, भाषा, भेष आणि भूमी कधीही बदलू नका, कारण ह्या चार गोष्टी महत्वाच्या आहेत. ह्या चार गोष्टींच मनुष्याला कुठे नेऊन ठेवतील, हे काही सांगता येत नाही. म्हणून ह्या चार गोष्टी कधीही बदलू नका, समाधानभाऊ शर्मा यांनी येथे बोलतांना केले.




प्रारंभी श्री. शर्मा यांचा अंदाज समितीचे अध्यक्ष तथा आमदार श्री. अर्जुनराव खोतकर आणि फेस्टीवलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील यांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. जालना गणेश फेस्टीवलमध्ये आज दुसर्या दिवशी त्यांचे किर्तन ठेवण्यात आले होते. त्यावेळी श्री. शर्मा बोलत होते. आठवे ते रुप । करावा उपाय।। यावर निरुपन करतांना श्री. शर्मा बोलत होते. यावेळी त्यांनी विविध उदाहरणे देत विठ्ठल हा कसा आहे,याबद्दल त्यांनी माहिती देऊन श्री. शर्मा यांनी काही घरगुती वादावरही भाष्य केले.

यावेळी फेस्टीवलचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब घुगे, कोषाध्यक्ष रवींद्र हुसे तसेच संयोजन समितीचे दिनेश फलके, माजी अध्यक्ष राजेंद्र गोरे, राजेंद्र राख, सुभाषराव कोळकर, शरद देशमुख, अशोकराव उबाळे, चंद्रशेखर वाळिंबे, किरण गरड, ज्ञानेश्वर कदम, सुरेशराव मुळे, प्रा. राजेंद्र भोसले, **पान ३ वर**

**आज मन उधान वाऱ्याचे कार्यक्रम**

### चार वर्षांनंतर पोलीसांना यश

## अल्पवयीन मुलगी व आरोपी पुण्यातून ताब्यात

### मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाची कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिटच्या पथकाने तब्बल चार वर्षांनंतर अल्पवयीन मुलगी आणि आरोपीला पुणे जिल्ह्यातील चाकण येथून ताब्यात घेण्यात यश मिळवले आहे. अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिट कक्षाकडे तपासावर असलेल्या गुन्हयांपैकी पोस्टे आष्टी येथे दिनांक २८/०४/२०२१ रोजी आष्टी येथुन एका अल्पवयीन मुलीस सेलगाव ता. परतुर जि. जालना येथिल रहिवासी मुलाने फुस लावुन पळवुन नेले बाबत तक्रारी वरुन भादवी कलम ३६३ प्रमाणे गुन्हा **पान ३ वर**

## पारशी टेकडीच्या विनाशाविरोधात महिला काँग्रेसचा आवाज बुलंद!

### बेकायदेशीर उत्खनन करणाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी; नंदा पवार यांनी जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरालगतची पारशी टेकडी ही जिल्ह्याच्या नैसर्गिक संपत्तीचा अविभाज्य भाग मानली जाते. या टेकडीवर जलसंवर्धन, वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाची अनेक महत्त्वाची उपक्रम राबविण्यात आलेले असताना, उद्योगपती कैलाश लोया व काही भूखंडधारकांनी येथे बेकायदेशीरपणे प्रचंड प्रमाणात गौण खनिज (मुरूम) उत्खनन करून टेकडीची अक्षरशः तोडफोड केली आहे.

महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षा नंदा पवार यांनी या गंभीर प्रकरणाबाबत जिल्हाधिकारी मॅडम यांना निवेदन देऊन उत्खनन तात्काळ थांबविण्याची मागणी केली आहे. तसेच दोषींवर जैवविविधता कायदा २००२ अंतर्गत गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, असे ठामपणे नमूद केले आहे.

पारशी टेकडीवर कृषी विज्ञान केंद्राच्या मदतीने सुमारे ३.५ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. येथे अनेक **पान ३ वर**

**दंड असूनही उत्खनन सुरूच**

या प्रकरणी कैलाश लोया यांना २०२४ मध्येच तब्बल १ कोटी ४७ लाख ७५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. मात्र अद्याप दंडाची वसुली झाली नसून, उत्खनन सुरूच आहे. महिला काँग्रेसच्या निवेदनात हा दंड वसूल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**या उत्खनन प्रकरणात जालना तहसील कार्यालयातील तलाठी इरफान यांनी कैलाश लोया यांच्या सांगण्यावरून खोटा पंचनामा करून शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या तलाठ्याला तात्काळ निलंबित करून कायदेशीर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

**कैलाश लोया** यांच्या सांगण्यावरून खोटा पंचनामा करून शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर आरोप



## संपादकीय

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर!

### भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व ; प्रणव मुखर्जी

भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचा आज स्मृतिदिन. पाच वर्षापूर्वी ३१ ऑगस्ट २020 रोजी त्यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता कारण प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एक ऋषितल्य व्यक्तिमत्व होते. प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एकमेव असे व्यक्ती होते की ज्यांच्याविषयी सर्वसामान्य नागरिकांपासून ते पंतप्रधानांपर्यंत आणि सत्ताधारी पक्षांपासून विरोधी पक्षांपर्यंत सर्वांनाच कमालीचा आदर होता. भारतीय राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले प्रणव मुखर्जी यांना भारतीय राजकारणातील भीष्म पितामह म्हणावे लागेल कारण जवळपास पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी भारतीय राजकारणात घालवले. त्याचा जन्म ११ डिसेंबर १९३५ चा. त्यांचे वडील स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. त्यासाठी त्यांनी दहा वर्ष कारावासही भोगला. प्रणव मुखर्जी यांचे वडील काँग्रेस कमिटीचे सदस्य होते तसेच पश्चिम बंगाल विधानपरिषदेचे अध्यक्ष होते त्यामुळे लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. प्रणव मुखर्जी यांनी कोलकाता येथील विद्यासागर विद्यापीठातून एम ए आणि एल एल बी केले. राजकारणात येण्याआधी त्यांनी काहीकाळ प्राध्यापक म्हणून नोकरी केली तर काहीकाळ पत्रकारिताही केली. पण लहानपणीच राजकारणाचे बाळकडू मिळाल्याने त्यांनी १९६९ साली राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच आपल्या वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्वाच्या जोरावर मंत्रिपदापर्यंत मजल मारली. आपल्या तल्लख बुद्धीने आणि दूरदृष्टीने त्यांनी त्या पदावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. नियोजन आयोगाचे अध्यक्ष, राज्यसभेचे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते, गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री तसेच विविध संसदीय समित्यांची अध्यक्षपदे अशी अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषवली. या सर्व पदांवर त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. प्रणव मुखर्जी हे त्यांच्या विविध लोकाभिमुख निर्णयाने देशभर चर्चेत राहिले. राष्ट्रपतीपद ग्रहण करण्यापूर्वीपासूनच संसदीय लोकप्रणालीत अद्ययावत माहिती ठेवणारे नेते म्हणून प्रणव मुखर्जी यांची ख्याती होती. लोकसभेत विविध पदे भूषवताना संसदेच्या आवारात अगदी विरोधी पक्षातील दिग्गज नेतेही त्यांच्याशी महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करताना आढळत. नव्या खासदारांसाठी त्यांचे भाषण, संसदीय आयुधे वापरून प्रश्न उपस्थित करणे हे प्रशिक्षणच होते. गृह, अर्थ, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण याबाबतचे त्यांचे ज्ञान चकित करणारे होते त्यामुळेच त्यांना भारतीय राजकारणात व ज्ञानी वर्तुळात संसदीय प्रणालीची एक चालती बोलती लायब्ररी संबोधले जायचे म्हणूनच राष्ट्रपतीपदी त्यांची निवड झाल्यावर एका योग्य नेत्याची निवड झाली अशीच भावना संपूर्ण देशाची झाली होती. राष्ट्रपतीपद हे घटनेतील सर्वोच्चपद आहे. या पदाला एक मान आहे, प्रतिष्ठा आहे. एक वेगळा शिष्टाचार असलेले हे पद आहे. राष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर त्यांनी या पदाची प्रतिष्ठा वाढवण्याचेच काम केले. प्रणव मुखर्जी यांनी राष्ट्रपती पदाच्या पूर्वी लावले जाणारे महामहीम हा शब्द न वापरण्याची प्रशासनाला सूचना केली. हे पद आणि त्याची समावेशकता वाढवण्याचा हा महत्वाचा निर्णय होता. भारतीय लोकशाहीचा इतिहास जगाला सांगणारा, जगाची भाषा समजणारा एक ऋषितुल्य वक्ता याठिकाणी विराजमान असल्याचे समाधान देशाला मिळाले. ३१ ऑगस्ट २020 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाची कधीही भरून न निघणारी हानी झाली. त्याच्या निधनाने भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व हरपले. भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले माजी राष्ट्रपती स्वर्गीय प्रणव मुखर्जी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !

**श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

---

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने शिक्षण सर्वांसाठी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २020 अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १0 टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर मा. न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)

पदवी (Under Graduate) : १७ हजार ७७८, पदव्युत्तर (Post Graduate) : १ हजार ९२७, डिप्लोमा (Diploma) : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार 0५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये डएइउ आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३00 विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF) सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची झहऊ पुर्ण झाली असून ११0 विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अधिछात्रवृत्ती :

JRF प्रमाणे (प्रथम 0२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती UGC निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३00, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १0८ आहे.

तसेच SRF प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील 0३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८00, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती (CSMNJRF) अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर (ward Letter) दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच. डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच. डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल (Dissertation) सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५0३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २020 मध्ये पात्र विद्यार्थी २0४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८0, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २0२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १0 आहेत. सन २0२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २0२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी टड थींश्रव ठरपज्ञळपस मध्ये २00 च्या आत रॅन्कीग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio - GER) ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

**- काशीबाई थोरात-धायगुडे**
**विभागीय संपर्क अधिकारी**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**


---

# सरकारी शक्तीचा दुरुपयोग नको!

राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने गुरुवारी शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासंदर्भातील शासन निर्णय जारी करताच हा वादग्रस्त मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेतून कोल्हापूर जिल्ह्याला वगळण्यात आल्याचे म्हटले जात होते. प्रत्यक्षात हा महामार्ग कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भुदरगड आणि आजरा या तालुक्यातूनच जाणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयातून स्पष्ट होत आहे. याचाच अर्थ राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीआधी जो शासन निर्णय काढला होता, तोदेखील या निर्णयाने रद्द झाला आहे. ही कोल्हापूरच्या शेतकऱ्यांची घोर फसवणूक असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. राज्यातील १२ जिल्हे, ३९ तालुके आणि ३७0 गावांमधून जाणारा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. वर्धा जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवी असा ८0२ किलोमीटरचा हा महामार्ग आहे. या महामार्गाच्या माध्यमातून तुळजापूर, कोल्हापूर, माहूर यांसह १८ धार्मिक स्थळांना जोडण्याचे नियोजन आहे. या महामार्गासाठी १२ जिल्ह्यातील २७ हजार ५00 एकर जमीन संपादित केली जाणार आहे. त्यामुळे मागील एक वर्षाहून अधिक काळापासून शक्तिपीठ महामार्गाला पश्चिम महाराष्ट्रातून जोरदार विरोध होत आहे.

१२ पैकी १0 जिल्ह्यांमधील शेतकरी फेब्रुवारी २०२४ पासून आंदोलन करत आहेत. त्यातही प्रामुख्याने कोल्हापुरातील शेतकऱ्यांच्या जमिनी या भूसंपादनात जास्त प्रमाणात जाणार असल्याने ते या महामार्गाच्याविरोधात आक्रमक होत एकवटले आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर मतदारसंघात शक्तिपीठ महामार्गाचा फटका महायुतीला बसल्यामुळे महायुतीचे बहुतांश आमदार आधीपासूनच सावध झाले होते. विधानसभा निवडणुकीत या नाराजीच्या लाटेचा तडाखा बसू नये म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने १५ ऑक्टोबर २०२४ ला कोल्हापूर जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्ग रद्द केल्याची अधिसूचना काढली होती. मात्र, कोल्हापूरकरांसाठी हे क्षणभंगूर स्वप्न ठरले. कारण निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेताच देवेंद्र फडणवीस यांनी आपला ड्रीम प्रोजेक्ट पुन्हा पोतडीतून बाहेर काढला. एवढेच नाही तर कितीही अडचणी आल्या तरी हा प्रकल्प पुढे रेटून नेण्याचा इरादाही जाहीररित्या सांगून टाकला. पुढच्या थोड्याच दिवसांनी मंत्रिमंडळ बैठकीत शक्तिपीठ प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २0 हजार कोटी रुपयांच्या तरतुदीला मान्यता देणारा निर्णय घेण्यात आला. त्याचे पडसाद मंत्रिमंडळ बैठकीसह कोल्हापुरातही उमटले.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह इतर मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तीव्र भावनांची माहिती दिली. त्यानंतर झालेल्या बैठकीपासून हा विषय रेंगाळत होता. शक्तिपीठ महामार्गामुळे कोकण वा गोव्यात पोहोचण्यासाठी नवा पर्याय उपलब्ध होईल, इंधन, प्रवासाचा वेळ वाचेल, पर्यटनाला चालना मिळेल, असा सरकारचा दावा आहे. जो योग्यही आहे. पण, त्याचसोबत सरकारने ही वस्तुस्थिती देखील लक्षात घेतली पाहिजे की याआधीच मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग व इतर काही मार्गाच्या भूसंपादनात शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी गेल्या आहेत. म्हणूनच पुन्हा शक्तिपीठसाठी आपली जमीन देण्यास इथले शेतकरी तयार नाहीत. अल्पभूधारक शेतकऱ्यांचे या भूसंपादनामुळे हाल आणखीनच वाढणार आहेत. कारण त्यांच्या जमिनी आता गुंठ्यावर आल्या आहेत. पुन्हा भूसंपादन झाल्यास शेतकरी अल्पभूधारक अथवा भूमीहीन व पुढे विस्थापित होऊ शकतो. सध्याच्या जमिनी याच शेतकऱ्यांच्या जगण्याचे एकमेव साधन आहे. अशावेळी शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही या जिल्ह्यांत निर्माण होऊ शकतो. त्यातून पुढे आत्महत्या व कायदा-सुव्यवस्थेचे वेगळे प्रश्न निर्माण होऊ शकतात. अनेक गावांमध्ये औद्योगिकीकरण, नागरीकरण होत असल्याने जमिनीचे भावदेखील वाढले आहेत. त्यांच्या भरपाईबाबतचे अनेक प्रश्नही अद्याप अनुत्तरीत आहेत. विदर्भ व मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत जमिनींची मोजणी, अधिग्रहण सुरू असताना कोल्हापूर जिल्हा मागच्या काही महिन्यांपासून तसा शांतच होता. परंतु नव्या शासन निर्णयामुळे जिल्ह्यातील अस्वस्थता पुन्हा वाढली आहे. महामार्गाच्या मूळ आखणीला पर्यायी मार्ग शोधण्याची जबाबदारी राज्य सरकारने महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळावर सोपवली आहे. सर्व उपलब्ध आणि संभाव्य पर्याय तपासून तसा प्रस्ताव राज्य सरकारला सादर करावा, असे आदेश रस्ते विकास महामंडळाला शासनाने दिले आहेत. शिवाय हा पर्याय शोधताना जिल्ह्यातील मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा केली जाणार आहे. सरकारची ही भूमिका सकारात्मक म्हणावी लागेल. सरकार खरोखरच पर्यायी मार्गाचा विचार करत असेल, तर शासन निर्णयात कोल्हापुतील तालुक्यांचा समावेश करण्याची काहीच गरज नव्हती. कारण यामुळे सरकार पर्यायी जागा शोधल्याचा दिखावा करून पुन्हा यूटर्न घेण्याची शक्यता असल्याचा संशय व्यक्त केला जातोय. विकास म्हणजे केवळ ठेकेदारांच्या भल्याचा विचार करणे नव्हे. या महामार्गात डोंगर पोखरून बोगदे निर्माण केले जातील, अनेक ठिकाणी भर घालून छोट्या नद्या-नाले बुजवले जातील. मध्यंतरी आलेल्या जोरदार पावसामुळे समृद्धी महामार्गालगतच्या शेतात पाणी तुंबण्याचे दृश्य समोर आले होते. त्यामुळे सरकारला खरोखरच हा महामार्ग विकासाचा महामार्ग व्हावा, असे वाटत असेल, तर शासकीय शक्तीचा दुरुपयोग न करता तसेच शेतकऱ्यांचे नुकसान होऊ न देता मध्यम मार्ग काढण्याची गरज आहे.



**श्री शिवाजी विठ्ठल चौगुले**
**कागल-कोल्हापूर.**

---

## वाचकांचे मनोगत

### विकासाचे स्वप्न पाहता,अडकलो समस्यांच्या जाळ्यात

महाराष्ट्रातील विविध शहरातील जागांचे क्षेत्रफळ कमी पडू लागले,असलेल्या सेवा सुविधा कमी पडू लागल्या,वाहतूक सेवा कोलमडून पडली.लोकसंख्या वाढली.असलेल्या सुविधा कमी पडू लागल्या.रस्त्यावरील वाहतूक वाढली ,वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी उड्डाणपूल आले,पदपथ कमी झाले म्हणून स्कायवॉक आले,रेल्वेमार्गावरील प्रवाशांची कोंडीवर मात करण्यासाठी मोनो रेल,मेट्रो रेल्वे नवी वाहतूक सेवा सुरू झाली. एवढे सर्व करूनही वाहतूक कोंडीतून सुटका नाही.याचे कारण जेथे - जेथे उड्डाणपूल, मोनो ,मेट्रोचे खांब उभे केले ते जमीनीवर. यामुळेच मोकळ्या जागांवर पावसाळ्यातील पाणी थांबत होते त्या जागा नष्ट झाल्या.पाणी जमिनीत मुरण्याची प्रक्रीया थांबली.पर्यायाने पाणी तुंबणे वाढले.रस्त्यावरील अतिक्रमणे वाढली.पदपथावर फेरीवाले बसले.एकुणच प्रशासनाने कायदे ,नियम मोडणारांकडे दुर्लक्ष केले.मुंबई अहमदाबाद, मुंबई नासिक, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर वाढलेली वाहनांची संख्या,रस्त्यावर दुतर्फा उभी असलेली वाहने वाहतूक कोंडीला कारणीभूत आहेत. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव येथील जंक्शन चारही बाजूने वाहने येतात मुख्य रस्त्याच्या दुतर्फा दुकानदारांनी आपले थाटलेले व्यवसाय याबद्दल कोणाचेच काही म्हणणे नाही.मंत्री जेव्हा येथून जातात तेव्हा त्यांच्या दिमतीला मोठमोठे वाहतूक अधिकारी सेवेस हजर असतात. पण सामान्य प्रवाशांना वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागते तेव्हा कोणीच दखल घेत नाही.रेल्वे लोकलचे ९,१२,१५ डबे झाले तरी प्रवाशांची गर्दीतून सुटका झाली नाही हेच खरे.विकासाचा विचार करताना पुढील भौगोलिक बाबींचा विचार करायला हवा.कायदे,नियम यांचे तंतोतंत पालन केले तर पुढील सर्व अनर्थ टाळता येतील.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# मराठवाड्यातील प्रथमच कमल वाढांक मुल्यमापन व सल्ला केंद्र परभणीत - सौ.वसुंधरा जामकर

**परभणी** - येथे मराठवाड्यात पहिल्यांदाच खाजगी स्तरावर कमल वाढांक मुल्यमापन व सल्ला केंद्र आणि पालक - पाल्य समुपदेशन केंद्र याचे डॉ.विशाला पटणम यांचे हस्ते उदघाटन करण्यात आले.

हे केंद्र पालकांना आपल्या पाल्याचे संगोपन करताना येणाऱ्या अडीअडचणी, निर्माण होणाऱ्या समस्यांच निराकरण समुपदेशनाधारे करण्याकामी सहकार्य करणार आहे.सक्षम बालक - पालक यांच्या विकासासाठी कटीबध्द असल्याचे समाधान डॉ.विशाला पटणम यांनी उदघाटन प्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्थेच्या संचालक सौ.दिपलक्ष्मीताई जामकर तर प्रमुख अतिथी संस्थेच्या संचालक सौ.कविताताई सुभेदार ,सदस्या सौ. संध्याताई जामकर ,सौ.सोनियाताई जामकर ,केंद्र संचालक सौ.वसुंधरा जामकर , प्र.प्राचार्य डॉ.संगीता आवचार , मुख्याध्यापक सौ.जयश्री हत्तीअंबीरे,आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात कै.सौ.कमलताई जामकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांचे हस्ते करुन करण्यात आली.प्रसंगी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

हे केंद्र सुरु करण्या मागील आपली भूमिका मांडताना केंद्राच्या संचालिका सौ.वसुंधरा जामकर म्हणाल्या की,हे केंद्र त्या पालकांसाठी आहे ज्यांना आपल्या पाल्याचे संगोपन करताना अनेक प्रश्न,समस्या समोर येतात परंतु त्यांचं यथायोग्य समाधान कारक उत्तर मिळत नाही. त्या सर्व पालकांना समुपदेशनाच्या माध्यमातून हे केंद्र सहकार्य करेल. तसेच बाळाच्या शारिरिक, मानसिक, बौध्दीक विकासा साठी महत्वाच्या असणाऱ्या आहार, आरोग्य,निद्रा, व स्वच्छता इत्यादी बाबतीत ही मार्गदर्शन केले जाईल.सर्व गरजू पालक - पाल्य यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे मत सौ.वसुंधरा जामकर यांनी व्यक्त केले.

या उपक्रमास उपस्थित मान्यवरांनी ही वसुंधरा जामकर यांना शुभेच्छा दिल्या.

डॉ.संगीता आवचार यांनी प्रास्ताविकातून शुभेच्छा देत परभणी करांची गरज लक्षात घेत जिल्हावासियांसाठी हे खाजगी केंद्र सुरु करुन सौ. वसुंधरा जामकर ताईंनी चांगले काम हाती घेतले याचा सार्थ अभिमान वाटतो.ताईंनी सक्षम बालकांसाठी, मातांसाठी सुरू केलेले कार्य निश्चितच दिशादर्शक आहे.

न्यूट्रेशन सह हार्मोन्स संतुलन राखण्यासाठी पालकांनी कोणती काळजी घ्यावी.बाळाच्या वाढत्या वया बरोबर त्याची यथायोग्य वाढ होणे ही काळाची गरज असल्याचे मत मांडत , मातांनी बालसंगोपना बरोबरच स्वतःसह , परिवाराचे आरोग्य संवर्धनासाठी जागृक राहात कार्य करताना मराठवाड्यातील पहिलेच खाजगी , कमल वाढांक मुल्यमापन व सल्ला समुपदेशन केंद्र , परभणी करांच्या सेवेत सुरू झाले आहे.

हे केंद्र नेहमीच समाज सेवा हा उदात्त दृष्टीकोन घेवून सेवेसाठी तत्पर असणार आहे. बाळाचा सर्वांगीण विकास आणि त्याचा पाल्याच्या शैक्षणिक कामगीरी वर होणारा परिणाम या बाबत अभ्यासपूर्ण संशोधन आणि समुपदेशन करणारे हे केंद्र असणार आहे. परभणी करांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा.कारण सक्षम माताच, सुंदर , संस्कारी , आणि सक्षम बालक घडवू शकते.असे अभ्यासपूर्ण मत डॉ. विशाला पटणम यांनी व्यक्त केले.

माजीमंत्री भारतभूषण स्व.रावसाहेब जामकर साहेबांनी




१९८३ साली परभणी जिल्ह्यातील पहिले महिला महाविद्यालय ,परभणी येथे सुरू करुन महिला सक्षमीकरणाला सुरुवात केली, ही या जिल्ह्यासाठी भूषणावह बाब होय. तीच दुरदृष्टी ठेवत सौ.वसुंधरा संग्राम जामकर यांनी हे सेवा कार्य हाती घेतले आहे. हे केंद्र निश्चितच सक्षम बालक- पालक यांची पीढी निर्माण करेल असा विश्वास डॉ. विशाला पटनम यांनी व्यक्त केला.

कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यीनींनी स्वतः सह लोकजीवनात जाणिवपूर्वक पालक - पाल्य विकासासाठी सदैव तयार राहावे असे आवाहन ही सौ.वसुंधरा जामकर यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.माधुरी पाटील यांनी केले.या मेळाव्यासाठी माता पालक , महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीं बहुसंख्येने उपस्थित होत्या.तसेच प्राध्यापक, कर्मचारी यांची ही उपस्थिती लाभली.

# सेवानिवृत्त झाल्या बद्दल परतूर आगाराच्या वतीने सेवा गौरव



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील बस आगारातील चालक शेख अब्दुल रहीम चाऊस यांचा दि.३० ऑगस्ट रोजी वयानुरूप सेवानिवृत्त झाल्याबद्दल परतूर आगाराच्या वतीने सेवागौरव करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख माधुरी देशमुख या उपस्थित होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त विभागीय वाहतूक अधिकारी पंडित चव्हाण,मुख्यध्यापक संजय जाधव,पत्रकार योगेश बरीदेयांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आगार प्रमुख माधुरी देशमुख यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की, आपल्या आगार विभागात सर्वात महत्वाचे पद हे चालकाचे आहे प्रवासी सुरक्षा ला प्राधान्य देत सर्वानी आपली जवाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडली पाहिजे तसेच अब्दूल राहिम यांनी विना अपघात सेवा केल्या बद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी वाहतूक नियंत्रक श्रीमती सुरेखा साळवे,श्रद्धा कुलकर्णी, नाथा ढेंगळे आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम पी गोडबोले यांनी केले तर भुजंग गोरे यांनी आभार मानले.

## पान १ वरुन

### सरसकट मराठे ...

एखाद्या समाजाला मागास ठरवण्याचा अधिकार हा फक्त मागासवर्गीय आयोगाकडे आहे, समितीकडे नाही. या पार्श्वभूमीवर समितीने अधिक टिप्पणी करण्याचे टाळले. त्यामुळे कायदेशीर प्रक्रिया आणि त्यातील गुंतागुंत अजून वाढली आहे.

मराठा आरक्षणाचा मुद्दा हा केवळ सामाजिक नव्हे, तर राजकीयदृष्ट्याही तापलेला आहे. मुंबईतील आंदोलनामुळे महाराष्ट्र सरकारवर प्रचंड दबाव आला आहे. आझाद मैदानात लाखोंच्या संख्येने जमलेला मराठा समाज हा सरकारसाठी स्पष्ट संदेश आहे - सरसकट मराठा कुणबी या मागणीवर तडजोड होणार नाही.

दुसरीकडे, कायदेशीर गुंतागुंतीमुळे सरकार सावध पावले टाकत आहे. मागासवर्गीय आयोगाची मंजुरी, न्यायालयीन अटी, आणि मागील निर्णयांमुळे निर्माण झालेली कायदेशीर अडचण या सर्वांचा विचार करून निर्णय घ्यावा लागणार आहे.

आंदोलन किती काळ टिकते आणि सरकार कोणता तोडगा काढते, यावर राज्यातील राजकीय समीकरणांवर मोठा प्रभाव पडणार आहे. जरांगे पाटील यांच्या आक्रमक भूमिकेमुळे मराठा समाजात निर्माण झालेली अस्वस्थता शमवण्यासाठी सरकारकडे वेळ खूपच कमी आहे.

### भाव, भाषा ...

अजिंक्य घोगरे, सुरेशराव मुळे, प्रसाद वाढेकर, राजेश काळे तसेच अवनिश गरड, संजय देशमुख, धन्नू काबलिये, जगत घुगे, हरिहर शिंदे, विमलताई आगलावे, अविनाश भंडे, रोहित देशमुख आदींची उपस्थिती होती. या उद्धाटन सोहळ्याचे सुत्रसंचालन प्रा. राजेंद्र भोसले यांनी केले.

मन उधाण वार्याचे...

रविवारी स्वर गंध प्रस्तुत मन उधान वार्याचे... हा मराठी गितांचा बहादार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

### अल्पवयीन मुलगी ...

दाखल करण्यात आला होता. परंतु बराच कालावधी होवुन गेला तरी पिडीत मुलगी व आरोपी मिळुन न आल्याने पोलीस अधिक्षक सो यांच्या आदेशाने गुन्हयाचा पुढील तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. सदर गुन्हयामध्ये

अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिट कक्ष. जालना यांनी तांत्रिक विश्लेषन करुन तसेच गुप्त बातमीदार नेमुन आरोपी व पीडीता यांची माहिती काढली असता नमुद आरोपी व पिडीत हे चाकण ता. खेड जि. पुणे येथे राहत असले बाबत खात्रीशिर माहिती मिळाल्याने त्यांना चाकण पुणे येथुन ताब्यात घेवुन गुन्हयातील पिडीत व आरोपीस पुढील तपास कामी संबंधीत पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिट कक्षाचे प्रभारी अधिकारी दिपाली शिंदे पोउपनि रविंद्र जोशी, सपोउपनि संजय गवळी, पोहेकॉ कृष्णा देठे पोहेकॉ सागर बावीस्कर (स्थागुशा), संदीप मांन्टे (सायबर), महिला अंमलदार संगिता चव्हाण, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.

### पारशी टेकडीच्या ...

पक्षी, प्राणी व जीवजंतूंचा अधिवास आहे. मात्र भूखंडधारकांनी हजारो हायवा मुरूम टेकडीवरून काढून नेला आहे. त्यामुळे टेकडीचे १५० ते २०० फूट भाग कापले गेले असून, भूस्खलन होऊन जीवितहानी होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

पारशी टेकडी हा जालना जिल्ह्याचा श्वास आहे. तिच्यावर कुठलाही गदा येऊ दिला जाणार नाही. जर प्रशासनाने तात्काळ कारवाई केली नाही तर महिला काँग्रेस कमिटी लोकशाही मार्गाने जोरदार आंदोलन उभारेल, असा इशारा नंदा पवार यांनी दिला आहे. जालना जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात आलेल्या या निवेदनामुळे पारशी टेकडीचे भवितव्य आणि प्रशासनाची भूमिका याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भोकरदन येथे महाआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ५८४३ रुग्णांची तपासणी






**भोकरदन । प्रतिनिधी-** मुख्यमंत्री सहायता निधी आणि दशरथ बाबा चॅरिटेबल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने २८, २९, आणि ३० ऑगस्ट रोजी भोकरदन येथे आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ५८४३ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली, ज्यामुळे ग्रामीण भागातील गरजूंना मोठा दिलासा मिळाला. या शिबिरात विविध आजारांवर तपासणी आणि उपचार उपलब्ध होते.

**शिबिराची उद्दिष्ट्ये आणि व्याप्ती**

हे शिबिर केवळ तपासणीपुरते मर्यादित नव्हते, तर मेडिसिन, सर्जरी, कान-नाक-घसा, डोळ्याचे आजार, स्त्रीरोग, कर्करोग, हाडांचे आजार, आणि लहान बालकांच्या तपासणी अशा विविध क्षेत्रातील सेवा एकाच छताखाली आणण्यात आल्या होत्या. यामुळे नागरिकांना वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याची गरज पडली नाही आणि त्यांचा वेळ व पैसा वाचला. विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना विशेषज्ञांकडून तपासणी करून घेण्याची संधी मिळाली, जी सहसा सहज उपलब्ध नसते. या शिबिरात रक्ताची तपासणी देखील करण्यात आली, ज्यामुळे अनेक गंभीर आजारांचे निदान वेळेवर होण्यास मदत झाली. या शिबिराचे उद्धाटन भारताचे माजी केंद्रीय रेल्वे मंत्री मा. श्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीने या शिबिराचे महत्त्व अधोरेखित झाले. याप्रसंगी आमदार मा. संतोष भैया दानवे, जिल्हा परिषदेच्या सदस्या मा. आशाताई पांडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील (जालना), जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे डॉ. सोपान चव्हाण, दशरथ बाबा चॅरिटेबल हॉस्पिटलचे व्यवस्थापक प्रसाद सर आणि डॉ. गवई यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. या सर्व मान्यवरांनी शिबिराला भेट देऊन आयोजकांना प्रोत्साहन दिले.

तपासणी केलेल्या रुग्णांचे विभागनिहाय विश्लेषण

या शिबिरात तपासणी झालेल्या रुग्णांची संख्या आणि त्यांचे विभागनिहाय वर्गीकरण हे या शिबिराच्या यशाचे एक महत्त्वपूर्ण सूचक आहे. एकूण ५८४३ रुग्णांपैकी सर्वाधिक रुग्ण हे मेडिसिन (३५९९) विभागातील होते, जे सामान्य आजारांच्या वाढत्या प्रमाणावर प्रकाश टाकते. यानंतर, डोळ्यांच्या (९३७) आणि हाडांच्या (८०८) आजारांच्या रुग्णांची संख्या लक्षणीय होती.

मेडिसिनः ३५९९, डोळ्याचे आजारः ९३७, हाडांची तपासणीः ८०८, सर्जरी तपासणीः ४३१, स्त्रीरोग तपासणीः ३४५, त्वचा रोग तपासणीः ३२७, कान, नाक, घसा तपासणीः २०३, हृदयाची तपासणीः २२७, दातांची तपासणीः ८३, कर्करोग तपासणीः ३८

ही आकडेवारी दर्शवते की ग्रामीण भागात सामान्य आजारांबरोबरच डोळे, हाडे आणि हृदयविकारांसारख्या गंभीर समस्यांवरही उपचारांची मोठी गरज आहे. कर्करोग तपासणीसाठी ३८ रुग्ण आल्याने, यासारख्या शिबिरांचे महत्त्व सिद्ध होते कारण वेळेवर निदान झाल्यास उपचाराची शक्यता वाढते.

हे महाशिबिर यशस्वी करण्यासाठी अनेक संस्था आणि व्यक्तींनी कठोर परिश्रम घेतले. दशरथ बाबा चॅरिटेबल हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी आणि अधिकारी, भोकरदन येथील सर्व शिक्षक, तसेच सर्व तालुकास्तरीय शासकीय आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. याव्यतिरिक्त, महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाअंतर्गत येणाऱ्या जालना येथील रुग्णालये, तसेच नूर मेडिकल कॉलेज, वरुडी, बदनापूर यांनीही सहकार्य केले. या सामूहिक प्रयत्नांमुळेच एवढ्या मोठ्या संख्येने रुग्णांना तपासणी आणि उपचार देणे शक्य झाले.

भोकरदन येथे आयोजित या महाआरोग्य शिबिराने केवळ आरोग्य सेवा पुरवल्या नाहीत, तर ग्रामीण भागातील आरोग्याच्या गरजा किती मोठ्या आहेत, हे देखील दाखवून दिले. अशाप्रकारची शिबिरे भविष्यातही आयोजित केल्यास, अनेक गरीब आणि गरजू लोकांना योग्य वेळी उपचार मिळून त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल.

# मानव-वन्यजीव संघर्ष धोकादायक वळणावर

महाराष्ट्रात व्याघ्र पर्यटनासाठी चंद्रपूर जिल्ह्याचे नाव अग्रस्थानी आहे. चंद्रपुर जिल्ह्यातील ताडोबा अभयारण्य व्याघ्र पर्यटनासाठी देशात सुप्रसिद्ध असून ताडोबा अभयारण्यात आजपावतो असंख्य लाखो पर्यटक, सिने अभिनेता,सेलिब्रिटींनी वन भटकंती केली आहे.वाघांच्या संख्येत चंद्रपूर जिल्हा प्रथम स्थानी आहे. चंद्रपूर जिल्हा वाघांचा जिल्हा म्हणून नावलौकिक मिळवत असताना मानव वन्यजीव संघर्षात प्रथम स्थानी येत आहे.

हे इथे ठळकपणे अधोरेखित करावेसे वाटते. नागपूर वन विभागात पेंच, ताडोबा- अंधारी, नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पार्गत गावांमध्ये वाघांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. मागील पाच वर्षात एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात १७५ नागरिकांचा थेट वाघाने हल्ला केल्यामुळे बळी गेला. तर चालू २०२५ या वर्षात जानेवारी ते जून या सहा महिन्याच्या काळात तब्बल पंचविस ग्रामस्थांचा नाहक बळी गेला.

जिल्ह्यातील वाघाव्दारे मृत्युमुखी पडलेल्या ग्रामस्थांचा मुद्दा विधानसभेतही प्रचंड गाजला आहे. या घटनेनंतर अनेक आंदोलने झालीत.या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना सत्तर हजारांपासून ते पंचवीस लाखांपर्यंत मदत शासनाकडून कुटुंबीयांना मिळत असते. अलीकडेच वाचण्यात आलेल्या वृत्तानुसार गतवर्षी मानव वन्य प्राण्यांच्या संघर्षात बळी पडलेल्या कुटुंबीयांना मदत देताना गतवर्षी २२० कोटी रुपये एवढी रक्कम मोजावी लागली.जी आतापर्यंतची सर्वाधिक होती. राज्यातील वन पर्यटन वाढीसाठी करोडो रुपये खर्च करून नवनवे प्रयोग आखले जात आहे.यात गैर नाही .परंतु गत पाच वर्षांपासून मानव आणि वनपरिक्षेत्रालगतच्या गावातील शेतकऱ्यांचे पशुधन वाघ व बिबट्यांच्या हल्ल्याने पछाडलेले आहे.

याशिवाय व्याघ्र हल्ल्या सोबतचं तृणभक्षी प्राण्यांमुळे शेतपिकांचे मोठे नुकसान होते. एकीकडे लहरी हवामान, शेतमालाचे ढासळते उत्पन्न, त्यात शेतमालांची आणि पशुधनांची जीवित हानी अश्या चौफेर दृष्टचक्राने वनपरिक्षेत्रा लगतच्या शिवारातील शेतकऱ्यांना ग्रासून काढले आहे. वन्य प्राण्यांच्या बचावार्थ अनेक गावकरी शेत पिकांच्या बंदोबस्तासाठी तारेचे कुंपण टाकतात. त्यात विद्युत प्रवाह सोडतात. अशांमुळे वन्य प्राण्यांचा प्राण जातो. आज मानव आणि वन्य प्राणी या दोघांचेही संरक्षण करणे गरजेचे आहे.मानव वन्यजीव संघर्षावर अनेक अहवाल प्रतिवर्षी सादर होतात.त्यांच्या शिफारसी वेळीच स्वीकारल्या असत्या तर आज मानव वन्यजीव संघर्षाची तीव्रता सौम्य झाली असती. अलीकडच्या काळात मानव वन्यजीव संघर्षावर कासवगतीचा उपाय म्हणून वनपरिक्षेत्र व परिसरातील गाव शिवारात कृत्रिम बुद्धिमत्तेवर (ए आय )आधारित कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा ते गोंदियातील नवेगांव बांध पर्यंत सुमारे तीन हजार एकशे पन्नास ए आय कॅमेरे जंगलात बसविण्यात येणार असल्याचे सांगितले जाते. एखादा वाघ किंवा बिबट्या गावं शिवारात किंवा खाजगी जागेत दिसेल, तेव्हा कॅमेरे डिटेक्ट करतील आणि तात्काळ अलार्म वाजेल. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवी जीवितहानी कमी होण्यास हातभार लागेल असा विश्वास व्यक्त करूया.

मानव वन्यजीव संघर्ष केवळ वन वनपरिक्षेत्र सीमेलगतच होत नसून अन्य लघु, मध्यम,नागरी शहरे सुद्धा वाघांच्या हल्ल्याने भयभयीत झाली आहे.राज्यातील अनेक गावात, वाड्यात, वस्त्यांमध्ये बिबट,वाघांचे दर्शन झाल्याचे वृत्त नियमितपणे कानी पडते. अनेकदा पशुधनाचा फडशा पाडतात.ग्रामस्थ गाव शिवारात सायंकाळच्या समयी जाण्यास धजावतात. वनाव्दारे तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या हजारो ग्रामस्थांच्या मनात भीतीचे सावट असते. वनपरिक्षेत्रा लगत असलेल्या नागरिकांच्या हितासोबतचं अन्य वन्यप्राणी जे नागरी वस्त्यांकडे कूच करीत आहेत,जे वन अधिवास क्षेत्राच्या बाहेर भटकंती करतात अशा वन्यप्राण्यांद्वारा होणारा धोका तेवढाच कायम असतो. मुळात ही गंभीर समस्या मानवाच्या अमर्याद स्वार्थापोटी जंगलांचा ऱ्हास करण्याने झालेली आहे. आज जंगलांचा अधिवास कायम राखून अन्नसाखळी कायम ठेवण्यावर भर दिला पाहिजे. तरच भविष्यातील मानव वन्यजीव संघर्ष हा संपुष्टात येईल. याचेही भान काळाच्या ओघात ठेवणे गरजेचे आहे.



**शशिकांत म.तोटे**

**दारव्हा,जि.यवतमाळ**

**मोः९१३०८३५४५८**


shashikanttote1979gmail.com

# श्री बजरंग गणेश मंडळाने साकारला भव्य राजवाड्याचा ऐतिहासिक देखावा

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याचा राजा व मानाचा दुसरा गणपती श्री बजरंग गणेश मंडळातर्फे जालना शहरातील कॉलेज रोडवर प्रथमच भव्य आणि ऐतिहासिक देखावा उभारण्यात आला असून, या देखाव्यातील राजवाड्याची नाजूक व उत्कृष्ट कारीगिरी जालनकरांना आकर्षित करत आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मंडळातर्फे पूर्ण दहा दिवस महाप्रसादाचे वाटप होणार असून, श्रद्धाळूंना या दिव्य सोहळ्याचा लाभ घेता येणार आहे. जालन्यातील राजा म्हणून ओळखला जाणारा श्री बजरंग गणेश मंडळ यंदा ७६ व्या वर्षात पदार्पण करत आहे. या मंडळाच्या गणेशोत्सवाची सुरुवात रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी झालेल्या भव्य आगमन मिरवणुकीने झाली. ढोल-ताश्यांच्या गजरात, फटाक्यांच्या रोषणाईत आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत ही मिरवणूक संपन्न झाली. २७ ऑगस्ट रोजी श्रीच्या मूर्तींची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी मंडळाने ३० फूट उंचीची श्रीगणेश मूर्ती स्थापित केली असून ती मुंबईच्या प्रसिद्ध सिध्दीविनायक आर्टस् या कलाकार समूहाने साकारलेली आहे.

जालन्यातील नागरिकांसाठी हा सोहळा ऐतिहासिक ठरणारा असून, जालनेकरांनी ऐतिहासिक राजवाड्याचा देखावा पाहण्यासाठी आवश्यक मंडळाला भेट द्यावी, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष ओम धोका, उपाध्यक्ष प्रतीक अग्रवाल, सचिव राकेश ठाकुर यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्यांनी केले आहे.





# परतूरला शास्त्री विद्यालयात 'मिशन एसएससी' उपक्रम



**परतूर । प्रतिनिधी -** शिवाजीनगर येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयात विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ' मिशन एसएससी ' उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रम ांतर्गत शनिवारी गणित विषयाची चाचणी घेण्यात आली.

जालना जिल्ह्यात माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी इयत्ता १० च्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. इयत्ता १० वी साठी मैत्री करूया गणिताशी, विज्ञानाशी, व इंग्रजी विषयाशी या अंतर्गत प्रत्येक शनिवारी विषयनिहाय प्रत्येकी दोन प्रकरणावर ४० गुणांची एसएससी बोर्ड पॅटर्ननुसार सराव चाचणी घेण्यात येणार आहे. तसेच सराव चाचणीचे उत्तरासहित स्पष्टीकरण विषय शिक्षकांद्वारे सोमवारी देण्यात येणार आहे. शाळांनी हा उपक्रम यशस्वीपणे राबवावा असे आवाहन शिक्षणाधिकारी बाळू खरात,संगीता भागवत तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. विक्रम सारुक यांनी केले आहे.

विद्यालयात चाचणी प्रभाविपणे राबविण्यासाठी पर्यवेक्षक राजकुमार राऊत,त्र्यंबक घुगे,परीक्षा विभाग प्रमुख संदीप वाघमारे, अरुण वावरे, मधुकर वखरे इतर परिश्रम घेत आहेत.

## CHANGE IN NAME

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
OLD NAME : **ASIFA BEGUM SARWAR BAIG**
CHANGE IN TO MY NEW NAME : **ASEFA BEGAM MIRZA SARWAR BAIG**
PRESENT ADD : W/O MIRZA SARWAR BAIG, FAIZ ULLUM ARBI MADARSA BAWLA PARK CHANDANZIRA JALNA PO JALNA DIST JALNA MAHARASHTRA - 431203




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.